# साहिर लुधियानवी - भाग १



अनगिनत लोगोंने दुनियामे मुहब्बत की है
कौन कहता है के सादिक ना थे जझबे उनके ?
लेकिन उनके लिये तशीर का सामान हि नही
क्यूंकि वो लोग भी अपनी ही तरह मुफलिस थे

(प्रेमात पडलेल्या अगणित लोकांच्या प्रेमभावना सच्च्या नव्हत्या असे कोणीच म्हणू शकणार नाही परंतु प्रेम व्यक्त करण्यासाठी त्यांच्यापाशी संपन्न आणि सबळ पाठबळ नव्हते. माझ्यासारखेच तेही खरेच कंगाल होते !)

भारतातील एकमेवात् द्वितीयम् गीतकार म्हणून बहुसंख्य लोक ज्यांची प्रशंसा करतात त्या अब्दुल हयी साहिर लुधियानवी यांचे जीवन म्हणजे दु:ख आणि वंचना यांनी भरलेली कहाणी आहे. ज्यांनी जगाला उपरोक्त काव्यपंक्तींसारख्या अनेक हृदयस्पर्शी रचना दिल्या त्या दिग्गजाच्या मनाचा आरसाच ह्या ओळींतून दिसतो.

८ मार्च १९२२ मध्ये लुधियाना येथे अब्दुल हयी यांचा जन्म झाला. त्यांचे पिता सरंजामशाहीतील जमीनदार होते. त्यांना बाई आणि बाटलीचा बराच षोक होता. त्यांना अनेक बायका होत्या पण अब्दुल हयी हा एकच मुलगा होता. तो फक्त आठ महिन्यांचा असताना त्याच्या वडिलांनी त्याच्या आईला

सोडून दिले. परंतु त्यांना मुलाचा मात्र ताबा हवा होता.

परंतु बायकोने त्यांस ठाम नकार दिला. हे प्रकरण कोर्टात गेले. एक वेळ अशी आली की या छानषौकी अय्याश बापाने मुलाला ठार मारण्याची धमकी दिली. आईने आपला शेवटचा दागिना विकून मुलाचे रक्षण केले.

मुलगा अखेरीस शाळेत जाऊ लागला, परंतु आईवडिलांच्या भांडणामुळे त्याच्या मनावर खोलवर आघात झाला होता. सततच्या वंचनेमुळे त्यांना चिंतन करायची सवय लागली. आपल्या मनातल्या विचारांना वाट करून देण्यासाठी ते थोडे थोडे लिहू लागले. त्यानंतर ते गव्हर्मेंट कॉलेज, लुधियाना येथे शिक्षणासाठी गेले आणि तेथे ते बरेच लिखाण करू लागले. त्यांच्यातील प्रतिभेची चमक पाहून लोक त्यांची प्रशंसा करू लागले. त्यांच्या बहुतांश कविता समाजमनाला क्लेश देणाऱ्या अनिष्ट प्रवृत्तींवर आधारित आहेत. लवकरच त्यांनी 'साहिर' (जादूगार) असे टोपणनाव धारण केले. ते एका स्त्रीच्या प्रेमात पडले, परंतु कदाचित त्यांची बिकट आर्थिक परिस्थिती पाहून तिने त्यास प्रतिसाद दिला नसावा. नंतर हळूहळू त्यांनी रूढ अर्थाच्या विरोधी कल्पना मांडण्यास सुरुवात केली, परंतु त्यास भरपूर विरोध झाला आणि त्यांना कॉलेज सोडण्यास सांगण्यात आले.

त्यानंतर ते लाहोरला गेले आणि तेथे स्वत:च्या आणि आईच्या उदरनिर्वाहासाठी मिळतील ती कामे करू लागले. 'सवेरा', 'शहकार' आणि 'आदाब-ए-लतिफ' ह्या तीन नियतकालिकांमध्ये लिखाण करून ती प्रसिध्द केली. लाहोरमधील ह्या नियतकालिकांतील काही कविता संग्रहित करून १९४५ साली 'तल्खियाँ' (कडवटपणा) नावाचा कवितासंग्रह प्रसिध्द केला. त्यांना प्रथमच मानमान्यता मिळाली आणि लोक त्यांना ओळखू लागले.

ह्यापैकी काही कविता म्हणजे 'ताजमहल', 'चकले' (कुंटणखाने) आणि इतर. 'ताजमहल' या कवितेमध्ये केवळ असहाय्य आणि निष्कांचन प्रेमिकांची बाजू माडली नसून ताजमहालचे वास्तूसौंदर्य वाढविणाऱ्या हजारो कुशल आणि निपुण कलाकारांचेही कौतुक केले आहे. लेखाच्या सुरुवातीला दिलेला उतारा 'ताजमहल'मधूनच घेतला आहे आणि 'चकले'मधील एका उताऱ्यामध्ये सुधारणा करून 'प्यासा' चित्रपटासाठी घेतला आहे.

ये कूचे, ये निलाम घर दिलकशी के
ये लूटे हुए कारवाँ जिंदगी के
कहाँ है, कहाँ है मुहाफिज खुदी के ?
जिन्हे नाझ है हिंद पर वो कहाँ है ?

(या गल्ल्या, ही छानछोकीची घरे, ही वाया गेलेली शापित जीवने, कुठे गेले ते सन्मानाचे रक्षणकर्ते, कुठे गेले ते लोक ज्यांना भारतावर गर्व आहे ?)

फाळणीनंतरच्या भारतात १९५७ मध्ये 'प्यासा' चित्रपट प्रदर्शित झाला, परंतु चकलेवरील मूळ कविता साहिर जेव्हा लाहोरमध्ये होते तेव्हा १९४५ मध्ये लिहिली होती. ती थोडीशी वेगळी होती. (म्हणजे 'जिन्हे नाझ है..' अशी नव्हती.) हिंदुस्थानच्या फाळणीनंतर साहिरना लहोरमध्ये खूपच अस्वस्थ वाटू लागले कारण त्यांचे सर्व हिंदू आणि शीख मित्र त्यांना सोडून गेले होते आणि पाकिस्तानात त्यांना मुक्तपणे लिहायला किंवा बोलायला मिळत नव्हते. त्यामुळे ते दिल्लीला निघून आले. तेथे थोडे दिवस काढून ते सरळ मुंबईला आले.

मुंबईला आल्यावर ते, लाहोरचे त्यांचे मित्र प्रेम धवन यांना भेटले. त्यांनी साहिरना नेहमीप्रमाणेच मदत केली. साहिर ४ महिने धवन यांच्याकडेच रहायला होते. साहिरच्या प्रसिध्द झालेल्या कवितांची एक-एक प्रत धवन यांनी आपल्या ओळखीच्या निर्मात्यांना आणि संगीतकारांना पाठवून दिली, जेणेकरून लोकांना त्यांच्या प्रतिभेची कल्पना येईल. साधारणपणे १९४९च्या सुमारास साहिर प्रोग्रेसिव्ह रायटर्स कॉन्फरन्सला गेले. तेथे त्यांना अली सरदार जाफ्री, मजरूह, कैफी आजमी, जान निसार अख्तर, इस्मत चुगताई, इ. साहित्यातील दिग्गज भेटले. त्यामुळे त्यांचा उत्साह प्रचंड वाढला. बरोबरच आहे, कारण ते त्यांच्यासारख्याच समविचारी माणसांत पोहोचले होते. त्यांच्यासाठी तीच जागा योग्य होती.

(क्रमशः)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

NOTE: Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who

put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com